P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

# प्रेसनोट दिनांक – ०३/०९/२०२४

## दि. ०२/०९/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ९५१/२०२४ भारतीय न्याय संहिता सन २०२३ चे कलम १०३(१) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०१/०९/२०२४ रोजी २०.३० वा चे सुमा. आरोपीचे राहते घर बापु शिंदे यांची रुम, वनदेवनगर लेन नं. ०१, आनंद हॉस्पीटल पाठीमागे, थेरगांव पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | दि.०२/०९/२०२४ रोजी २१.५५ वा |
| फिर्यादी | :- | श्वेता रणजित घोरपडे/ शिंदे, वय ३४ वर्षे, सहायक पोलीस निरीक्षक, नेमणुक- वाकड पोलीस ठाणे, पिंपरी चिचवड |
| आरोपी | :- | प्रथमेश काळुराम भोईर वय २४ वर्षे रा. बापु शिंदे यांची रुम, वनदेवनगर लेन नं. ०१, आनंद हॉस्पीटल पाठीमागे, थेरगांव पुणे. मुळगांव- मु.पो. आडले खुर्द ता. मावळ जि. पुणे. **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने त्याचे वडील मयत काळुराम महादेव भोईर वय ५२ वर्षे हे वारंवार चहाचे हॉटेलचे गल्ल्यातील पैसे घेऊन जात असल्याचे कारणावरुन त्यांना राहते घरी भांडण करुन खो-याचे लाकडी दांड्याने त्यांना मारहान करुन गंभीर जखमी करुन त्याचा खुन केला आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि नलावडे ९५५२५२०१९३ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी ९९८/२०२४ भा.न्याय सहिंता २०२३ चे कलम ८५, १०८, ३(५) प्रमाणे. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | डिसेंबर २०२३ रोजी पासुन दिनांक १७/८/२०२४ रोजी पावेतो लिओनारासोसायटी फलॅट नंबर ३०३, एफ. विंग गोदरेज म्हाळुंगे, पुणे या ठिकाणी |
| गुन्हा दाखल | :- | दि.०२/०९/२०२४ रोजी २०.४९ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी, वय-४२ वर्षे, व्यवसाय गृहिणी, रा फुलमळा लेक पॅलेस, सी विंग ७०१, मु. पो. शिरवळ, ता खंडाळा, जि. सातारा |
| आरोपी | :- | १) अक्षय अरविंद दळवी वय २७ रा.-भोसले मळा, अयोध्यानगरी सोसायटी, सातारा ,२) पुष्पा अरविंद दळवी वय ४५ रा.-भोसले मळा, अयोध्यानगरी सोसायटी, सातारा , ३)प्रज्ञा राजेश शिर्के वय ३४ रा. नेरुळ, सीवुड, नवी मुंबई **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी यांनी संगणमत करुन फिर्यादी यांची मुलगी आसावरी अक्षय दळवी,वय-२३ वर्षे हिचा लग्नानंतर काही दिवसातच लग्नात कमी दागिने घातले, तसेच इतर घरातील किरकोळ कारणांवरुन फिर्यादी यांचे मुलीचा मानसिक, शारिरीक व आर्थिक छळ करुन त्यांचे जासाला कंटाळुन तिस गळफास घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | मसपोनि जाधव ८६८९९३११६६ |

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | पिंपरी ७६८/२०२४, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ (अ),३२४(४), ३३१(३)(४), प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि ३१/०८/२०२४ रोजी १९.०० ते दि ०२/०९/२०२४ रोजी ०६.०० वा. च्या दरम्यान संदेश गॅस एजन्सी तपोवन मंदिर रोड पिंपरी गाव पिंपरी पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०२/०९/२०२४ रोजी १६.२२ वा |
| फिर्यादी | :- | कुमारी शोभा मोतीलाल शेट्टिया वय-७२ वर्ष, रा.२४/४२१ लोकमान्य हॉस्पीटल जवळ निगडी प्राधिकरण पुणे |
| आरोपी | :- | अज्ञात चोरटा |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांच्या मालकीचे संदेश गॅस एजन्सी येथील एजन्सीचे लोखंडी शर्टर कोणीतरी अज्ञात चोरटयाने कशाचेतरी सहाय्याने उचकटुन गॅस एजन्सीमध्ये प्रवेश करुन काचेचे कॅश काउंन्टर तोडुन कॅश काउंन्टरमध्ये असलेल्या टेबलच्या ड्रॉवर मध्ये ठेवलेले १,८९,१९१/- रु रोख रक्कम घरफोडी चोरी करुन घेवुन गेले आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा/१४२५ शिंदे ७०२०७९२१३३ |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | आळंदी २४६/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ कायदा ३०५, ३३१(४) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०२/०९/२०२४ रोजी रात्रौ ०१.०० ते ०३.०० वा चे दरम्यान माजगाव वस्ती, चिंबळी ता. खेड,जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२/०९/२०२४ रोजी १९.२१ वा. |
| फिर्यादी | :- | पवन खंडू पाठारे वय ४३ वर्षे,काम- शेती, मुळ रा. माजगाव वस्ती चिंबळी ता.खेड जि.पुणे, |
| आरोपी | :- | अज्ञात इसम |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व त्यांचे घरातील सर्वजण झोपलेले असताना कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांचे घरातील मुख्य दरवाजा कडी कोयंडयाचे स्क्रु काढुन आत प्रवेश करून हॉलमधील २ कपाटामध्ये ठेवलेले एकुण ९३,०००/- रु किंमतीचे सोन्याचे व चांदीचे दागिने व रोख रक्कम घरफोडी चोरी करुन चोरून नेले आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि लोहार ,९८५०२२३१९० |

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | रावेत ३२८/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८ (४),३१६(२) सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (D) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १६/०६/२०२४ ते २८/०८/२०२४ रोजीचे दरम्यान पुनावळे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०२/०९/२०२४ रोजी २१.१४ वा |
| फिर्यादी | :- | पुरुष फिर्यादी वय ४२ वर्षे व्यवसाय खाजगी नोकरी रा. पुनावळे, ता. मुळशी, जि. पुणे |
| आरोपी | :- | अनोळखी बँक अकाऊंट धारक /व्हाटसअॅप नंबर ८१४८९१०४७५, ८०१५२३८२४२ यांचे वापरकर्ता |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे घरी असताना wealth pioneers या ग्रुपला फिर्यादीचा व्हाटसअॅप नंबर अॅड केला. त्यावेळी wealth pioneers या ग्रुप मधील महिला नामे नैना व्हाटसअॅप नंबर वर ८१४८९१०४७५, ८०१५२३८२४२ त्यांनी फिर्यादीस सांगितले की, जर तुम्हाला शेअर मार्केट मध्ये गुंतवणुक करायची असेल तर आम्ही तुम्हाला चांगल्या प्रकारे प्रॉफीट मिळवुन देउ. सदर व्हाटसअॅप नंबर ८१४८९१०४७५, ८०१५२३८२४२ वरून दररोज मेसेज फिर्यादी यांचे व्हाटसअॅप नंबर वरती येत होते. सदर ग्रुपमधील व्हॉटसअॅप नंबर ९१५०२५५२६८ चा वारकर्ता नामे राजेश याने देखील मला गुंतवणुकीतुन चांगले प्रॉफीट मिळत असल्याचे सांगितले व मला गुंतवणुक करण्यास सांगितले. तुसेच नैना व्हाटसअॅप नंबर ८१४८९१०४७५, ८०१५२३८२४२ यांनी मला एक लिंक पाठवुन GalvetSct अॅप डाऊनलोड करण्यास सांगितले मी GalvetSct अॅप डाऊनलोड करून त्यामध्ये लॉगीन करून फिर्यादी यांचे अंकाऊन्ट तयार करून नैना |

व्हाटसॲप नंबर ८१४८९१०४७५, ८०१५२३८२४२ हीने फिर्यादीस युजर नेम व पासवर्ड दिला. त्यांनर महिला नामे नैना मो.नं. ८१४८९१०४७५, ८०१५२३८२४२ हीने फिर्यादी यांना काही स्टॉक घेण्यास सांगितले स्टॉक घेण्यासाठी तसेच टॅक्स भरण्यासाठी त्याचप्रमाणे ॲप अनलॉक करण्यासाठी म्हणुन तीने मला १) इको बॅक अकांऊन्ट नंबर २३४१०२१०००४०५० २) पंजाब ॲन्ड सिंध बॅक अकांऊन्ट नंबर ८५४११००००१००३ ३) बंधन बॅक अकांऊन्ट नंबर २०१०००३१११६३५४१ या खात्यांवरती वेळोवेळी पैसे पाठवायला सांगितले. त्याप्रमाणे फिर्यादीस यातुन अधिक फायदा मिळेल म्हणुन खात्यातुन वरील तीन खात्यावर मिळुन एकुण ३८,८२,३५१/- रूपये पाठवले. परंतु फिर्यादी यांचे वरील ॲपमधील खाते लॉक केले व सदरचे पैसे फिर्यादीने वारंवार मागणी करुन देखील परत न करता फिर्यादीचा विश्वासघात करुन फसवणुक केली. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- वपोनि फटांगरे ९४२३६६९२९१

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- चाकण ५९३/२०२४ भा.दं.वि.क ३३७,३३८ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि २०/०२/२०२४ रोजी १९.०० ते ०७.०० वा सुमारास आयएआय इंडस्ट्रीज प्रा. लि. कंपनी नाणेकरवाडी या कंपनीमध्ये ता खेड जि पुणे

गुन्हा दाखल :- दि ०२/०९/२०२४ रोजी १८.०४ वा.

फिर्यादी :- मंगेश गोविंद चौधरी वय २० वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. बालाजी नगर, गणेशनगर १, संदिप मेदनकर यांचे खोलीत, मेदनकरवाडी, ता. खेड, जि. पुणे. मु.रा. मु.पो. कधेर, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद

आरोपी :- प्रभाकर सिन्हा आयएआय इंडस्ट्रीज प्रा. लि. कंपनी नाणेकरवाडी या कंपनीचे सुपरवायझर ता. खेड, जि. पुणे.

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे फलेअरींग मशीनवर काम करीत असताना मशीन खराब होवुन गरम झाली व फिर्यादी हे जॉबचा पाईप काढत असताना मशीनचे दोन्ही डाय जोरात फिर्यादी यांचे डावे हातास धडकले त्यात फिर्यादीचा हात सापडला व अपघात होवुन फिर्यादीचे डावे हाताची करंगळी व शेजारील दोन बोटे अर्धी तुटुन जखमी झालो. फिर्यादीचे तीनही बोटांचे ऑपरेशन करण्यात आले असुन त्यात तीन बोटे अर्धी झालेली आहेत. सदर अपघातास सुपरवायझर प्रभाकर सिन्हा हे जबाबदार आहेत. सदर मशीन नादुरुस्त झाली असुन दुरुस्त करणे आवश्यक आहे असे आम्ही आगोदर सांगितलेले होते असे असतानाही आरोपी यांनी फिर्यादीस त्या मशीनवर काम करण्यास सांगितले, त्यामुळेच सदरचा अपघात झालेला आहे.म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोफौज गाडेकर ९९२३२९३०४२

०७.

पोस्टे व गु रजि.नं. :- तळेगाव दाभाडे ३७३/२०२४ भारतीय हत्यार कायदा कलम ४, २५ सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१) , १३५ १४२ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि ०२/०९/२०२४ रोजी १८.०० वा चे दरम्यान सोमाटणे फाटा येथुन पुणे मुंबई जुना महामार्ग ता. मावळ जि. पुणे

गुन्हा दाखल :- दि ०२/०९/२०२४ रोजी २०.३३ वा.

फिर्यादी :- किशोर दत्तात्रय गिरीगोसावी, वय ४२ वर्ष, पोलीस हवा. क्र.१४४६, नेमणुक - तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, पुणे

आरोपी :- प्रकाश उर्फ बाळा प्रमोद शेडे वय २८ वर्शे, रा.खंडोबा माळ, तळयाजवळ, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे **आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने यान मा.पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ - २, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांचे तडीपार आदेश संपुर्ण पुणे जिल्हा हद्दीमधुन १० महिन्याकरीता तडीपार केला असताना सुध्दा तडीपार आदेष रद्द किंवा निवासस्थानी येण्याची परवानगी न घेता जाणुन बुजुन सदर आदेशाचे उल्लंघन केले आहे. त्याचप्रमाणे त्याच्या ताब्यात बेकायदा बिगरपरवाना २००/- रु किंमीतचे धारदार कोयत्या सारखे शस्त्र मिळुन आलेले आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा/कोकतरे ८६०५००१७३४

०८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण ५९४/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १३२,३५२, ३५१(२)(३) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०२/०९/२०२४ रोजी १४.०० वा बस घेवुन तळेगाव चौक येथुन पुणे बाजुकडे वळवुन घेवुन बस स्टॉपवर ता. खेड, जि. पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | दि.०२/०९/२०२४ रोजी १९.२२ वा |
| फिर्यादी | :- | पांडुरंग मारुती भोमाळे वय ३८ वर्षे, शिक्षण- ९ वी, व्यवसाय - बस ड्रायव्हर, ला. नं.एमएच १४२००८०००१४३७ बॅच नं. ४७१४ आरटीओ पिंपरी चिंचवड, रा. शिरोली, ता. खेड, जि. पुणे. |
| आरोपी | :- | सुभाष गोविंद पवळे वय २५ वर्षे, रा. भारतमाता चौक, जीवन हॉटेलचे बाजुला, मोशी, ता. हवेली, जि. पुणे. **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांना पहीली पाळी सकाळी ०७.०० ते ०४.०० या वेळेत मार्ग क्र. १२० भोसरी ते महाळुंगे बस क्र. एम.एच. १२ एच. बी. ०४९७ या बसवर ड्रायव्हर म्हणुन डयुटी होती सदर डयुटीवर सकाळी ०७.०० वा फिर्यादी वाहक नामे सुदर्शन रावसाहेब जाधव वाहक नं. ५८४९, बॅच नं. १२०७९ आरटीओ श्रीरामपुर रा. चहोली फाटा, रिध्दीसिध्दी टॉवर, ता. हवेली, जि. पुणे असे आम्ही दोघेजण सकाळी पासुन प्रवासी वाहतुक करीत होतो. दुसरी ट्रीप महाळुंगे ते भोसरी अशी दुपारी ०१.०५ वा महाळुंगे येथुन बसमध्ये प्रवासी घेवुन आम्ही दोघेजण भोसरी येथे जाण्यास निघालो. दुपारी ०२.०० वा बस घेवुन तळेगाव चौक येथुन पुणे बाजुकडे वळवुन घेवुन बस स्टॉपवर प्रवासी चढ उतार साठी थांबलो प्रवासी घेवुन पुढे निघालो असतानाचा एक इसम प्रवासी म्हणुन मागच्या दाराने बस मध्ये चढला तो आरडा ओरडा करुन शिवीगाळी करु लागला तेंव्हा वाहक सुदर्शन जाधव यांनी त्या पुढे त्यांचे कडे येण्यास आवाज देवुन सांगितले तो मोठ मोठयाने शिवीगाळी करीत पुढे आला, तेंव्हा फिर्यादी यांनी बस रस्त्याचे कडेला घेवुन थांबविली. फिर्यादी व वाहक सुदर्शन जाधव असे दोघांनी त्यास विचारले की काय झाले तु शिवीगाळी का करीत आहेस, तेंव्हा तो आम्हाला म्हणाला की तुम्ही बसवाले आमचे रिक्षाचे प्रवासी घेवुन चाललात आमचे नुकसान करता असे म्हणुन इंजिनचे बॉनेटवर नाचुन फिर्यादी व वाहक यांना मोठ मोठयाने अर्वाच्य भाषेत शिवीगाळी करुन फिर्यादी करत असलेले सरकारी कामात अडथळा आणला आहे |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोफौज सुपेकर ८३७८९७३७४३ |

०९.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | सांगवी ३५९/२०२४, भारतीय शस्त्र अधि १९५९ चे कलम ३(२५), महाराष्ट्र पोलीस अधि १९५१ चे कलम ३७(१) (३) सह १३५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०२/०९/२०२४ रोजी १९/३० वा चे सुमारास वसंतदादा पुतळ्या समोरील गणपती विसर्जन घाटावरील रस्त्यावर जुनी सांगवी पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि ०२/०९/२०२४ रोजी २०.५२ वा. |
| फिर्यादी | :- | प्रवीण दौलत पाटील, वय ३५ वर्षे, पो.ना.ब.नं. १५३४, नेमणुक सांगवी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड शहर पोलीस आयुक्तालय,पुणे. |
| आरोपी | :- | अनिकेत ऊर्फ सोन्या अशोक बाराथे, वय २४ वर्षे, रा. शिवाजी महाराज पुतळ्या मागे, बाराथे वस्ती, दापोडी पुणे.**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने पिंपरी चिंचवड अन्वये मा. पोलीस आयुक्त साो, पिंपरी चिंचवड यांनी पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात पर्यंत घातक हत्यार बाळगण्यास मनाई असताना त्याने त्याचे कब्जामधे २५,५००/- रु किंमतीचे ०१ देशी बनावटीचे पिस्टल व एक जिवंत काडतुस विनापरवाना बेकायदेशीर रित्या अनाधिकाराने जवळ बाळगुन असताना मिळुन आला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि ताकभाते ९२८४६४९१७८ |